# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Marathi

## Assignment

## Session: 2019 – 2020

SEAL

(60) Purushottam Kahaparde Health & Education Society's

# Yashoda Girls' Arts & Commerce College

Sneh Nagar, Wardha Road, Nagpur-440015

Accredited 'B++' with 2.82 CGPA for First Cycle by NAAC

## *CERTIFICATE*

*Name of the Department*......Marathi......Com..............

*This is to certify that this Assignment / Record contain is the bonafide record of the work Ms.* Pramila Ravindra Makode.

*of B A / B Com Semester I/II/III/IV during the academic year* B.A I sem. 2019-20

*The candidate has satisfactorily completed assignment as prescribed by Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur and as assigned by the concern department for the subject* Marathi Com.

Department of Marathi

Name of the Faculty

(Dr. Govind N. Rawleka)

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

*Internal* *External* *Principal*

Page No.
Date

Name :- Pramila Ravindra Makode

Yashoda Girls Art &
Commerce College.

Subject :- Marathi

Set :- B.A. Ist sem.

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

① शेतकऱ्याचे असूड या पाठामध्ये महात्मा फुले यांनी तत्कालीन सरकारच्या समोर शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कोण-कोणते उपाय सांगितले ते स्पष्ट करा.

→ प्रस्तुत पाठ शेतकऱ्याचा असूड या महात्मा जोतिराव फुलेंच्या प्रसिद्ध ग्रंथातून घेतला असून तत्कालीन इंग्रज राजवटीतील व्हाइसरॉयला निवेदनातून महात्मा फुलेंनी भारतीय शेतीच्या स्थितीगतीचे अत्यंत समर्पक वास्तववादी वर्णन करून भारतीय शेतीत इंग्रज सरकारने सुधारणा करण्यासंबंधी आपले. परखड मनोगत प्रस्तुत पाठातून व्यक्त केले आहे. भारतीय शेतकऱ्यांना आर्थिक आणि सामाजिक विकास व्हावा, शेतीचे नवीन तंत्रज्ञान त्यांना मिळावे भारतीय शेतकरी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे. दारिद्र्यातून भारतीय शेतकऱ्यांची मुक्तता व्हावी या उद्देशाने महात्मा ज्योतिराव फुलेंचे विचार भारतीय शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरतात महात्मा फुले तत्कालीन इंग्रज सरकारला निवेदनातून सांगू इच्छितात की, इंग्रज सरकारने भारतीय शेतकऱ्यास युरोपियन शेतकऱ्यासारखे विद्वान यंत्र-ज्ञान इत्यादी सोयी सुविधा निर्माण करून द्याव्या जेणेकरून भारतीय शेतकरी आपल्या परंपरावादी कायदा करून शेतीत सुधारणा करू शकेल त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील सर्व लोकांनी गाय, बैलाची हत्या न करण्यासंबंधी सरकारने कायदा.

करून पशुमुल्यखातील गाय, बैल, खरेदी
करण्याकरिता सरकारने, शेतकऱ्यांना प्रेरित
करायला पाहिजे. योग्य बैलांचा पुरवठा
सरकारने त्यांना केल्यास शेतकऱ्यांना
शेतीची मशागत करण्यास सोपे जाईल
आणि शेणखताच्या मोठ्या प्रमाणात
त्याचा पुरवठा होईल व भारतीय शेती
सुपीक बनेल असे महात्मा फुले यांना
वाटते भारतीय शेतीची प्रतवारी वाढावी
म्हणून डोंगरपर्वतावरील गवतझाडांच्या
पाना-फुलांचे खत पावसाच्या हंगामात
कुजलेले सत्व पाण्याच्या पुराबरोबर
वाया जाता कामा नये म्हणून महात्मा
ज्योतिबाराव फुले तत्कालीन इंग्रज सरकारला
सुचवितात की सरकारने लष्करातील
काळ्यागोऱ्या पोलिस खात्यातील
शिपायांकडून जागोजागी बांध घालून
बंधारे अशाप्रकारे निर्माण करावे की
डोंगरदऱ्यातून वाहणारे पाणी तुडुंब
शेतीमध्ये मुरून नंतर ते नदीनाल्यास
मिळावे अशी उपाययोजना सरकारने
केल्यास भारतीय शेती अत्यंत सुपीक
होऊन जमिनीची प्रतवारी वाढून
उत्पन्नात भरमसाठ निर्माण होईल आणि
त्याप्रमाणे लष्करी शिपायांसही
उद्योग करण्याची सवय आत्मसात होऊन
त्यांना रोगराईची बाधासुद्धा होणार
नाही व लष्कराचे शिपायांचे शरीर
आरोग्यही उत्तम राहतील असे महात्मा
फुले यांनी वाटे. शेतकऱ्यांविषयीची तळमळीची फुलेंची भावना
यातून व्यक्त होते

(२) सासुरवास या कथेमध्ये लक्ष्मीबाई टिळकांनी सासुरवासाचे चित्रण रेखाटले आहे ते स्पष्ट करा.

→ लक्ष्मीबाईंच्या सासऱ्यांचा स्वभाव अत्यंत कठोर संशयी निर्दयी. अमानुष, खोडसा होता. स्त्रीवर्गावर पुरुषपणाचा तोरा गाजविण्यात खरा पुरुषार्थ आहे असे बहुधा त्यांनी वाटत असावे ते देवभक्त देवपूजा करणारे तसेच तत्कालीन आचार विचार पाळणारे होते. पण सुनेवर जुलूम करावे हे त्यांना का वाटत होते कळत नाही. वास्तविक लक्ष्मीबाईंसारखी अत्यंत सोशिकपणा असणारी सून होती टिळकांसारखा आज्ञाधारक पुत्र होता तरीही ते विनाकारणच सुनेला त्रास द्यायचे. हे कथेतून स्पष्ट होते. अर्थात त्यांनी सुनेला कधी अपशब्द वापरले नाही तिच्या अंगाला स्पर्शही केला नाही. परंतु तरीही त्यांचे वागणे मात्र लक्ष्मीबाईंना मानसिक व शारीरिक त्रास देणारे सिद्ध होत होते. जीवन माणसाचे खोड कधीच जात नाहीत पण जिवंत असलेला मुलाचे आणि सुनेचे बारसा तेरावा घातला आणि त्यामागे देवपूजेची उपकरणे नीट धुतली नाही हे क्षुल्लक कारण असणे ही बाब नक्कीच खटकणारी आहे लिहताना चीड आणणारी आहे. सुनेने शपथेने अगदी नव-याची शपथ वाहिली तरी समाधान नाही.

लोकेच नाही तर कुपथ्या घरगुती बाबतीत बायकांची नाही तर कुटुंब सभा बोलावून त्या मुलीच्या तोंडात बोळा घालतील असे समजावणे जगदीश असभ्यपणाचे वाटे. या परिस्थितीत शृंगार करून मामी खूपच नटवेली स्वभाव प्रत्ययास येतो.

एकदा तर यांनी मुलास दुसरे लग्न करण्याचा व बायकोला मारहाण देण्याचा अनाहूत सल्ला दिला पण टिळक समंजस होते. त्यांना वकिलांचा स्वभाव ठाऊक होता. शिवाय लक्ष्मीबाईवर त्यांचे प्रेम होते घरापुढील विहिरीचे पाणी रात्री सुनेने एकटी जाऊन भरून आणावे असा सासरे देतात वास्तविक काम ते मुलास सांगू शकले असते परंतु मामंजींचे लक्ष्मीबाई हे लाडके 'सावज' होते व तिला कोठे घर आणि किती नाही असे त्यांना जाहीर वाटत होते कारण मी घरातील कडील सासरा, मोठा हे तीरा दाखवून त्यांना सुनेला छळायचे होते. त्यात त्यांना भारी आनंद मिळत होता. स्वतःची विकलांगी सुनेला घाबरायला सांगणे यात पराकोटीची अमानुषता आहे असे कोणी ह ळ्ळो नरे ते किळसवाणे काम करीत असतांना उद्धाला किळस मात्र यायला नको अशी त्यांची अपेक्षा जर किळस आलीच तर त्यालाच दुसरी कोणती तरी शिक्षा व्हायची हे प्रकार अत्यंत दुर्दैवी आहेत.

देव - दानवांची निर्मिती ही काही स्वार्थी
मनुष्यांनी केलेली आहे हे लोकांना
पटवून द्यावे असा या समाजक्रांतीचा
कार्यक्रम कवीजवळ कवितेचे हत्यार
आहे ही पद्यपंक्तीची (कवितेची) तरफ
धर्म नियमांच्या आमच्या हातात दिलेली
आहे. ही तरफ जनतेच्या डोक्यावर
ठेवून आम्ही हे सनातनी, रूढीग्रस्त,
कुजलेल्या विचाराचे जग उलथवून टाकू
असा कवीला आत्मविश्वास आहे.
कवी म्हणतो: समाजातील या रूढीग्रस्तते
विरुद्ध अन्याय जुलुमाविरुद्ध आपण
सगळीकडे झेंडा उभारून, धामधूम उडवून
या अन्यायाचे, जुलुमाचे तुकडे तुकडे
करू समूळ नष्ट करू या देशात
स्वर्गभूमी होण्यासाठी लोकांना
जागृत होण्याचे आवाहन कवी करीत
आहे, 'झोपल्या ते संपल्या' हा क्रांतीचा
मंत्र देऊन जुलुमाविरुद्ध लढण्याचा
सज्ज होण्यास ते सांगत आहे.
जुलुमाविरुद्ध निकराने 'लढा' किंवा
लढता लढता मरण पत्करा, आणि
स्वतःच्या क्रांतिज्वालांचा जयजयकार
करा' असा ते लोकांना संदेश देत
आहेत अशाप्रकारे कवी केशवसुतांनी
रूढीविरुद्ध अन्याय, अत्याचार आणि
जुलुमाविरुद्ध लढण्याची तयारी स्फूर्ती
कवितेतून व्यक्त केली आहे.

Page No. | Date

# प्रथम घटक चाचणी

CLASS :- B.A I sem

Session :- 2019-2020

Yashoda Girls' Arts & Commerce College
SEAL

16/20

प्रश्न 1 भक्तभेटि च्या पाठात म्हाइंभट यांनी
वोरंगळ प्रदेशातील भक्ताची हकिगत
कशी मांडली ?

→ श्रीचक्रधरस्वामी एकाकी अवस्थेत
भ्रमंती करीत असताना वोरंगळ प्रदेशात
(आंध्रप्रदेश) गेले तेथे असणाऱ्या त्यांच्या
भक्तांची हकिगत या लीळेत आलेली
आहेत, वरंगळ प्रदेशातील एका गावात
एका ब्राह्मणाचे आणि त्याच्या बहिणीचे
चित्त श्री चक्रधर स्वामींनी वेधून
घेतले. त्यामुळे त्या ब्राह्मणाची.
बहीण स्वामींच्या सेवेत रममाण झाली.
लोक आपापसात कुजबुजु लागले. तेव्हा
ब्राह्मण म्हणाला की प्रत्यक्ष डोळ्याने
पाहुनच निर्णय घेईल त्याप्रमाणे तो.
सत्य शोधण्यास गेला असताना
त्याला असे दृश्य दिसले की त्याला
बहिणीचे डोके, स्वामीच्या मांडीवर
असून तिला गाढ निद्रा लागली
होती. ते दृश्य पाहून स्वाभाविकच त्या
ब्राह्मणाला राग आला आणि त्याने
तलवार उपसली परंतु आश्चर्य असे की
स्वामींकडे पाहताच त्याचा संताप मावळला.
नंतर स्वामींनी त्या ब्राह्मणास
परगावी वास्तव्य करण्यास सुचविले.
त्याप्रमाणे तो परगावी राहायला गेला
त्यावेळी तो गावाच्या शिवेपर्यंत येत असे
आणि गावाकडून येणाऱ्या प्रत्येक ब्राह्मणास
विचारित असे की गौर श्री मुर्ति :लाव

लांब कान : विसाळनेम असलेला पुरुष कुठून आहे का? हा त्यांचा प्रश्न शोधण्याचा असे ते पाहून त्या कुलच्या ब्राह्मणाच्या मनात असा विचार उद्भवला की स्त्रियांना पुरुषांच्या उघडा मोठ नसतो. इतक्या त्या दोन पुरुषांतील मोह म्हणजे नवलच आहे. त्याच्या पृच्छनाचे खोटे उत्तर देताना त्याने म्हटले की, त्याचे सर्वदेशाने निधन झाले हे ऐकून त्या ब्राह्मणभक्ताने स्वतःचा देहत्याग केला। नंतर त्याने हे वृत्त चतुर स्वामींना सांगितले तेव्हा स्वामी म्हणाले की तुम्ही त्याने असे खोटे कसे बोलविले? आणि असे म्हणून कुदळी पाणी होऊन ते लपून निघाले.

---

6

SEAL

(2) 'स्वराज्य रक्षण' या पाठात रामचंद्र पंत अमात्य यांनी छत्रपती राजारामाचे चित्रण कसे केले आहे?

→ शिवाजी महाराजांच्या मागे संभाजीराजांनी असाधारण पराक्रम करून स्वराज्याचे रक्षण केले. परंतु त्यांच्या मृत्यूनंतर स्वराज्यावर मोठे संकट आले. बुलंद राज्य विस्कळीत झाले. छोटे-छोटे शत्रू प्रजेला पिडा देऊ लागले. आधी राज्याचा बंदोबस्त केल्यास इतर हेतू आपोआप साध्य होतात त्याप्रमाणे. राजाराम महाराजांनी प्रथम राज्याचा बंदोबस्त ठीक केला. त्यांनी सरकारकून सरदार इत्यादी लहान थोर सेवकांचा यथोचित सन्मान केला. त्यांचे समाधान केला. अनेक नवीन सेवकांची नेमणूक केली. उद्योगामधील दोष दूर केले जे प्रतिकूल होते त्यांना योग्य ते शासन देऊन अनुकूल करून घेतले जे उत्पाती होते त्यांना मारून त्यांचा कायमचा बंदोबस्त केला. संपूर्ण प्रजेस अभय दिले प्रजेचा उपद्रव दूर केला. देश स्वस्थ केला. किल्ले दुरुस्त केले. काही नवीन पद्धतीने बांधून घेतले किल्ल्यावर शस्त्रासाठी ठेवला. विश्वासू माणसाची नेमणूक केली घोड्यांच्या पागा सुधारल्या नवीन घोडी घेतली तोफखाना सज्ज ठेवला. राज्य आबादान केले पराक्रम करण्यासाठी सक्षम बनविले. प्रथम शेजारील शत्रू सिद्दी याचा बंदोबस्त केला. त्याने

SEAL

संकटकाळात अनेक किल्ले जिंकले होते.
राज्याची राजधानी रायगडदेखील त्यांच्या
ताब्यात होता. त्याने प्रजेला पिडा दिली
होती त्याला पोर्तुगीज व मोगलांची
मदत मिळत होती म्हणूनच त्याला
आतापर्यंत कोणाला जिंकता आले नव्हते.
राजारामांनी सिद्दीला मिळणारी मदत प्रथम
रोखली आणि त्याच्यावर आक्रमण करून
त्याचा बंदोबस्त केला. नंतर सावंतादि जे
राज्यास संकटमूळ झाले होते त्यांचा
निःपात केला जे वतनदार स्वतंत्र झाले
होते. ते भयभीत होऊन शरण आले
त्यांना पूर्ववत सेवेत दाखल करून घेतले.
म्हैसूरकरादि पाळेगारांस यथोचित शिक्षा
करून प्रतिवार्षिक कारभाराच्या नेमावर
आणून ठेवले राज्य निष्कंटक झाले
राजांना हिंदराज्यकार्यधुरंधर राज्याभिवृद्धिकर्ते
असा लौकिक प्राप्त झाला शत्रूने हाय
खाल्ली आहे. मांडलिक भयभीत झाले आहेत
ही संधी साधून राजारामांनी तमाम
प्रांताचे रजपूत रुजू केले. आणि समुद्रनावर
ते नर्मदापार झाले श्रीकृपेने अल्पकाळातच
मुख्य शत्रूचा पराभव करून दिल्ली, आग्रा,
लाहोर, काबूल, बंगाल, ठट्टा इत्यादी प्रांत
व तेथील किल्ले जिंकून स्वामी वाराणशीस
आले व श्रीविश्वेश्वराची त्यांनी स्थापना
केली अशाप्रकारे रामचंद्रपंत अमात्य
यांनी राजारामाच्या पराक्रमाचे वर्णन केले
आहे. ते अतिशयोक्तीपूर्ण असून क्वचित

ठिकाणी जातिरंजीत व अनैतिहासिक स्वरूपाचे आहे. स्वामींनी नर्मदापार करून उत्तरेत विजय मिळविला असे अमात्य लिहितात परंतु तशी लढाई प्रत्यक्षात झालीच नाही. तशी लढाई करण्याचा मनसुबा मात्र होता परंतु लेखकाने तशी लढाई प्रत्यक्षात झाली व राजारामांनी त्या लढाईत विजय मिळविला असे काल्पनिक वर्णन केले आहे.

(३) ज्ञानदेवांनी हरीपाठाच्या अभंगातून नामस्मरणाचे महत्व कसे सांगितले?

→ संत ज्ञानदेवांनी आपल्या हरिपाठाच्या अभंगातून नामस्मरणाचे महत्व स्पष्ट केले आहे. नामस्मरणाने मनुष्य सर्वाधिकारी होतो. नामस्मरणाशिवाय परमेश्वरप्राप्तीचे इतर सर्व उपाय व्यर्थ आहे. नामस्मरण हा भगवंत प्राप्तीचा सर्वात सुलभ मार्ग आहे हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात. ज्ञानेश्वर म्हणतात. देवाच्या दारात क्षणभर उभे राहिल्याने चारी मुक्ती साधता येतात परमेश्वराचे नामस्मरण सतत केल्याने मोठे पुण्य मिळते. या पुण्याची गणना करता येत नाही, संसारात राहूनच हरीच्या नामस्मरणाने आपला उद्धार करून घेता येतो त्यासाठी वेदशास्त्राचा अभ्यास करण्याची आवश्यकता नाही, आणि हे महर्षी व्यासांनी सांगितले आहे. आपल्या भक्तीने पांडवांनी श्रीकृष्णाला अंकीत करून घेतले होते म्हणून परमेश्वर प्राप्तीसाठी सर्वांनी सर्वात सुलभ असा नामस्मरणाचा मार्ग निवडावा. या मार्गाशिवाय इतर मार्ग कसे व्यर्थ आहेत हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात. ज्ञानेश्वर सांगतात की, परमेश्वर प्राप्तीसाठी भाव आवश्यक असते. भक्ती आवश्यक असते. या भावाशिवाय तीर्थयात्रा केल्या व्रतवैकल्ये केली तरी काही फायदा होत नाही या भावानेच परमेश्वराचे आकलन होते.

SEAL

भगवंताचे खरे स्वरूप कळते. म्हणूनच परमेश्वर दिसत नाही तरी त्याला असे ओळखता येत नाही. पारा खाली सांडला तर जसा भरता येत नाही त्याप्रमाणे परमेश्वर प्राप्तीसाठी केलेले इतर सर्व प्रयत्न वाया जातात. ज्ञानेश्वर म्हणतात की, निवृत्तीने म्हणजेच माझ्या गुरूंनी मला संपूर्ण ज्ञान दिले त्यामुळे तो निर्गुण परमेश्वर मला प्राप्त झाला.

हे नामस्मरण कसे करायचे हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात की हरिपाठाचे अभंग अठ्ठावीस आहेत अत्यंत विश्वासाने ज्ञानदेवांनी ते रचले आहेत त्यांचे नित्य पठण जो करील तो सर्वाधिकारी होईल. एका ठिकाणी मन एकाग्र करून स्वस्थ चित्ताने बसावे आणि अत्यंत आनंदाने परमेश्वराचे स्मरण करावे अंतकाळी तसेच संकटाच्या वेळी हा हरी भक्तांच्या अंतर्बाह्य सांभाळ करतो. अनेक संत सज्जनांनी याची प्रचिती घेतली असून जे आळशी आणि मंदबुद्धीचे असतात. ते मात्र भक्ती करत नाहीत. श्रीगुरु निवृत्तींचे प्रेमळ वचन ऐकून ज्ञानदेवांना तात्काळ आनंद झाला अशाप्रकारे ज्ञानदेवांची आपल्या हरिपाठाच्या अभंगातून नामस्मरण महत्त्व विशद केले आहे.

SEAL

(4) घनश्याम सुंदरा या कवितेत होनाजी बाळा यांनी भक्तीचे सामर्थ्य कसे मांडले आहे?

→ प्रस्तुत 'घन:श्याम सुंदरा' ही त्यांची अत्यंत लोकप्रिय भूपाळी असून या प्रकारच्या भूपाळीचे त्यांना अपार कीर्ती प्राप्त करून दिली आहे. कवितेतील प्रात:काळचे स्वच्छ व पवित्र वर्णन मनाला आल्हाद देणारे. प्रस्तुत भूपाळीत भक्ती आणि प्रभात समयीचे शुभ्र वातावरण यांचा अपूर्व संगम साधलेला आहे. पहाटे स्नान करून गोपिका अलंकार घालून नटलेल्या आहेत. कपाळावर कुंकू लावले आहे. परमेश्वराचे नाम घेत त्यांनी मंथन सुरु केले आहे. भक्त देवाची भक्ती करत आहेत. ब्राह्मण देवाची पूजा करत आहेत. वैष्णव विठ्ठलाची पूजा करत आहेत. शिवगण शिवाला भजत आहेत. तर काही आपल्या देवतांच्या भजनी लागले आहेत. पक्षि-गण त्यांच्यात मग्न झाले आहेत. सूर्य उगवून वर आला आहे. मुकुंदा तू अजून उठ नाही. तर तू इतका वेळ झोपलास हे नंद राजाला समजेल.

अशाप्रकारे होनाजी बाळा यांनी घनश्याम सुंदरा या कवितेत भक्तीचे सामर्थ्य मांडले आहेत.

SEAL
PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15